**नि.फौ.ख.क्र. ४९/२०२५**
**निशाणी क्र. १८**

**अभियोग पक्षातर्फे सा. क्र. १ यांचा सरतपास शपथेवर.**
**नाव:** सुमन नामदेव बनकर
**वय:** ७२ वर्षे, **व्यवसाय:** शेती,
**पत्ता:** मौजे शेळगाव, ता. इंदापूर, जि. पुणे.

**<u>सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एन. पी. कुचेकर यांचे मार्फत सुरु</u>**

अंदाजे तीन वर्षापूर्वी घटना घडली. मौजे शेळगाव येथील गट क्र. १२४२ मधील विहीरीवर मी लक्ष्मी लाडा कंपनीची मोटार चालू करणेकरिता गेले होते. त्यावेळी मी पाहिले की, त्याठिकाणी माझी मोटार नव्हती. दोन—तीन दिवस मी शोध घेतला परंतु मोटार मिळून आली नाही म्हणून मी वालचंदनगर पोलीस ठाणे येथे गेले व फिर्याद दिली. आता मला माझा फिर्यादी जबाब वाचून दाखविण्यात आला. तो तोच असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझा निशाणी अंगठा आहे. त्यास **निशाणी क्र. १९** देण्यात येते. फिर्याद दाखल केल्यानंतर पाच ते पाच दिवसांनी पोलीसांनी मला बोलोविले व माझी मोटार सापडल्याचे सांगितले त्याचप्रमाणे ज्यांनी मोटार चोरली होती ते देखील सापडल्याचे सांगितले. माझी मोटार मला परत मिळाली नाही. मोटार कोणी चोरली हे मला माहित नाही.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीचे वकील श्री. एल. पी. शिंगाडे यांनी उलटतपास नाकारला.</u>**
सबब, उलटतपास नाही.
फेरतपास नाही.

माझे समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत,

स्वाक्षरी/—
(एस. बी. लेंडवे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर.

ठिकाण: इंदापूर
दिनांक : ०८/०१/२०२६